!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# स्मार्टसिटीत मनपाच्या आर्थिक सहभागाचे नियोजन करा-खासदार चंद्रकांत खैरे

## स्मार्ट सिटी संदर्भात खासदार चंद्रकांत खैरे यांनी घेतली बैठक

## आयुक्तांचा सकारात्माक प्रतिसाद

संभाजीनगर दि.२६- स्मार्ट सिटी योजनेत शहराचा समावेश झाल्याने पहिल्या दोन वर्षांसाठी चारशे कोटी रुपयांच्या योजनांसाठी केंद्राचे दोनशे कोटी लवकरच मिळणार आहे त्यात शंभर कोटी मनपा व शंभर कोटी राज्य शासनाचे असणार आहे. मनपाच्या आर्थिक सहभागाच्या हप्त्यांचे योग्य नियोजन करण्याच्या सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मनपा आयुक्त ओमप्रकाश बकोरीया यांना दिल्या.

सुभेदारी विश्रामगृह येथे आज स्मार्ट सिटी संदर्भात खासदार चंद्रकांत खैरे यांनी आयुक्तां समवेत बैठक घेवुन केंद्र व राज्य शासनाकडे प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रेल्वे, सार्वजनिक बांधकाम, एमएसआरडीसी, एमएसआरटीसी, नॅशनल हायवे अॅथॉरीटी यांची संयुक्त बैठक घेवुन प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्याचे नियोजन करु अशी माहिती खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिली. नगररचना विभागातुन संकलीत निधी स्मार्ट सिटीच्या कामासाठी राखीव ठेवु व पॅन सिटी तसेच ट्रान्सपोर्ट व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी प्राधान्यक्रम असणार असल्याचे ओमप्रकाश बकोरीया यांनी स्पष्ट केले.

दिवाळी व दसरा सणांमुळे मुख्य बाजारपेठेत संभाव्य गर्दी लक्षात घेवुन मुख्य बाजारपेठेला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांची डागडुगी व डांबरीकरण खासबाब म्हणुन तात्काळ करण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिल्या. स्मार्ट सिटी संदर्भातील कामांच्या विषयी बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली व प्रलंबित केंद्र व राज्य शासनाच्या कामासाठी पाठपुरावा करु असे आश्वासन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिले. शहरात कचऱ्यातून वीज निर्मीतीसाठी एमआयडीसी किंवा डीएमआयसी मध्ये जागेसाठी प्राधान्याने प्रयत्न करण्याची मागणी मनपा आयुक्तांनी केली. येत्या २९ तारखेच्या बैठकीत अपुर्व चंद्रा यांच्याशी यासंबंधी सविस्तर चर्चा करुन जागा मिळवून देवु असे खासदार चंद्रकांत खैरे यांनी स्पष्ट केले. तसेच आयुक्तांनी शहरात एअर शो करण्यात यावा व आमखास मैदाना समोरील चौकात रणगाडा बसवण्यात यावा त्यासाठी सहकार्य करण्याचे सांगितले. याविषयी संरक्षण मंत्र्यांची भेट घेवु असे खासदार खैरे यांनी सांगितले.

रेल्वे स्टेशन एमआयडीसी उड्डाणपुलाच्या चे रेल्वेला द्यावयाच्या ४८ लक्ष रुपयांच्या संदर्भातही तसेच रेल्वे कडुन भुसंपादित केलेल्या जागेवर तात्काळ काम सुरु करण्या संदर्भात सकारात्मक भुमिका घेण्याची मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आयुक्तांकडे केली. या विषयी तातडीने निर्णय घेवु आयुक्तांनी आश्वस्त केले. तसेच संग्रामनगर भुमिगत मार्ग व मुकुंदवाडी उड्डाणपुला संदर्भातही बैठकीत चर्चा करण्यात आली.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525